Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ७, अंक २२] गुरूवार ते बुधवार, जून २४-३०, २०२१/आषाढ ३-९, शके १९४३ [ पृष्ठे ४, किंमत : रुपये ११.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग एक-अ—नागपूर विभागीय पुरवणी

**(भाग चार-ब मध्ये प्रसिध्द करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.**

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १०१.

**मुख्याधिकारी, नगर परिषद, यांजकडून**

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३८ व २३(१) नुसार उमरेड नगर परिषद क्षेत्राची विकास योजना तयार करण्याचा इरादा जाहीर करणेबाबत**

क्रमांक एमसीयू-वियो-९२-२०२१.—

नगर परिषद, उमरेड शहराची सुधारित अधिक वाढीव सीमा विकास योजना शासनाचे नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई, शासन निर्णय क्र. टीपीएस-२४९८-२८७-प्रा.क्र.-२५-९८-नवी-९, दिनांक ८–७-२००३ अन्वये अंशतः मंजूर झाली असून ती दिनांक २५-८-२००३ पासून अंमलात आली आहे व शासनाचे नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई, शासन निर्णय क्र. टीपीएस-२४९८-२८७-प्रा.क्र.-२५-९८-नवी-९, दिनांक १९-०७-२००५ ला वगळलेल्या भागाची विकास योजना मंजूर झालेली असून ती दिनांक ०५-१०-२००५ पासून अंमलात आलेली आहे. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३८ नुसार नगर परिषद क्षेत्राचा नियोजनबद्ध विकास होण्यासाठी त्या क्षेत्राच्या विकास योजनेची फेर तपासणी (सुधारीत) तयार करणे आवश्यक आहे.

सबब, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३८ अनुषंगाने कलम २३(१) अन्वये नगर परिषद उमरेड क्षेत्रासाठी विकास योजना (सुधारीत) तयार करण्याचा इरादा जाहिर करण्यासाठी सर्वसाधारण सभेचा ठराव क्र. २८, दिनांक १०-०६-२०२१ अन्वये मान्यता दिली आहे. त्यानुसार सदरची सूचना प्रसिद्ध करण्यात येत आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २३ (२) नुसार उमरेड नगर परिषद, विकास योजनेमध्ये समाविष्ट असलेल्या क्षेत्राचा हद्द दर्शविणारा व मुख्याधिकारी यांनी स्वाक्षांकित केलेला नकाशा, नगर परिषदेच्या कार्यालयात, कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी, कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनासाठी ठेवण्यात आलेला आहे.

ज्या नागरिकांच्या याबाबत काही सूचना/हरकती असतील त्यांनी ही सूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिद्ध होईल त्या तारखेपासून साठ (६०) दिवसांच्या आत मुख्याधिकारी, उमरेड नगर परिषद यांचेकडे लेखी स्वरूपात द्याव्यात विकास योजना तयार करताना त्या सूचना हरकतींचा योग्य तो विचार करण्यात येईल.

**सुवर्णा दखणे,**
मुख्याधिकारी,
नगर परिषद, उमरेड.

उमरेड :
दिनांक ११ जून २०२१.

ना.-एक-अ-१ (१५५२).

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १०२.

BY CHIEF OFFICER, MUNICIPAL COUNCIL

**Declaration of Intention to prepare Development Plan (Revised) of Umred Municipal Council as per Section 38 read with Section 23*(1)* of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966**

No. MCU-VYO-92-2021.—

The Development Plan of Umred has already been partly sanctioned by Urban Development Department Government of Maharashtra *vide* it's Notification No. TPS-2498-287-CR-25-98-UD-9, dated 8th July 2003 with effect from 25th August 2003 and *vide* resolution No. TPS-2498-287-CR-25-98-UD-9, dated 9th July 2005. Excluded part developement plan which came in force with effect from 5th September 2005. It is necessary to prepare Development plan (Revise) for the area of Municipal Council as per Section 38 read with section 23(*1*) of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 for planned development of the said area.

Hence, the Umred Municipal Council by its resolution No. 28, dated 10-06-2021 has given consent to declare intention to prepare Development Plan (Revise) as per provision of Section 38 read with section 23(*1*) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966. Accordingly, this notice is being published.

The plan showing boundry of the area included in Development Plan of the Umred Municipal Council is kept open for inspection by the public on office working days, during office hours at the office of the Municipal Council, as required under Section 23(*2*) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.

Any suggestion/objection of the public in this regard, may be forwarded in writing to the Chief Officer, Umred Municipal Council within a period of 60 (Sixty) days from the date of publication of this notice in *Maharashtra Government Gazette.* The suggestions/objections shall be duly considered while preparing the Development Plan.

SUVARNA DAKHANE,
Chief Officer,
Municipal Council, Umred.

Umred :
Dated the 11th June 2021.

---

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १०३.

**अध्यक्ष, नगर परिषद, यांजकडून**

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये मंजूर विकास योजना वर्धा मध्ये किरकोळ फेरबदल**

क्रमांक १९८१-नपव-नरवि-२०२१.—

वर्धा शहराची सुधारित विकास योजना शासन अधिसूचना क्र. टिपीएस-२६०१-१३८०-सीआर ६०(डी)-२००२-युडी-९, दिनांक ९ जानेवारी, २००४, अन्वये मंजूर झाली असून ती दिनांक २५ फेब्रुवारी २००४ पासून अंमलात आलेली आहे.

सदर मंजूर विकास योजनेतील मौजा स्टेशन फैल, वर्धा संवर्ग क्र. ८ मधील भूखंड क्र. १८/१, क्षेत्रफळ १८२०७ चौ. मी. व मौजा स्टेशन फैल, वर्धा संवर्ग क्र. २८ मधील भूखंड क्र. ७/१, क्षेत्र फळ ९०१६ चौ. मी. धारकाचे नाव नझुल सरकार या जागेपैकी १.२० हेक्टर जागा आरक्षण क्र. ५८ ब (गार्डन) करीता आरक्षित आहे.

शहर विकास योजनेतील उक्त जागेवर अल्पसंख्यांक समाज भवन बांधणेकरिता महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१) अन्वये सदर जागा आरक्षणातून वगळून सार्वजनिक, निमसार्वजनिक विभागात अंतर्भूत करण्यास सर्वसाधारण सभा दिनांक २६ सप्टेंबर २०२० चे ठराव क्र. २८ अन्वये मंजुरी प्राप्त झालेली आहे. सदर फेरबदल दर्शविणारा विकास योजनेचा नकाशा नगर परिषदेच्या नोटीस बोर्डवर नागरिकांच्या माहितीसाठी कार्यालयीन वेळेत पाहण्याकरीता प्रसिद्ध करण्यात येत आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये करावयाच्या उपरोक्त फेरबदलाबाबत नागरिकांच्या सूचना व हरकती असल्यास, सदरची नोटीस शासन राजपत्र मध्ये प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून ३०(तीस) दिवसांचे आत लेखी स्वरूपात मुख्याधिकारी, नगर परिषद, वर्धा यांचेकडे सादर करावे.

प्राप्त सूचना व हरकतींचा, फेरबदलाचा प्रस्ताव शासनाने मंजुरी करीता सादर करण्यापूर्वी विचार करण्यात येईल.

**अतुल तराळे,**
अध्यक्ष,
नगर परिषद, वर्धा.

वर्धा :
दिनांक १० जून २०२१.

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १०४.

BY PRESIDENT, MUNICIPAL COUNCIL

**Minor modification u/s 37 of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 in Wardha Development Plan**

No. 1981-MCW-TPW-2021.—

Development Plan of Wardha Town has been sanctioned by Government *vide* Notification No. TPS-2601-1380-CR 60(D)-2002-UD-9, dated 9th January 2004 and came into force *w.e.f.* 25th February 2004.

As per the said sanctioned Development Plan of Wardha Town, land bearing Block No. 8, Plot No. 18/1, area 18207 Sq. M. & Block No. 28, Survey No. 7/1, Area 9016 Sq. M. of Mouza Station Fail, an area admeasuring 1.2 Hectare is reserved as Site No. 58(B) “Gardern”.

Planning Authority Municipal Council, Wardha intends to build a Community Hall for Minority Community over the said reserved land. Wardha Municipal Council *vide* its Resolution No. 28, dated 26th September 2020 passed the Resolution to make minor modification u/s 37 of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 to delete the said reservation and land so released to be shown in public and Semi-public use for the construction of Community Hall for Minority Community.

The document showing proposed modificaion is kept open for public for inspection on the Notice Board of Wardha Municipal Council on working days in working hours. Any person having suggestion/objection regarding the proposed modification may communicate to the Chief Officer, Municipal Council, Wardha within 30 (Thirty) days from the date of publication of this notice in *Government Gazette*.

Suggestions and objections will be considered by the Wardha Municipal Council before submission to Government.

ATUL TARALE,
President,
Municipal Council, Wardha.

Wardha :
Dated the 10th June 2021.

---

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १०५.

**अध्यक्ष, नगर परिषद, यांजकडून**

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २१(२) अनुषंगाने २३(१) नुसार साकोली नगर परिषद क्षेत्राची विकास योजना तयार करण्याचा इरादा जाहीर करणेबाबत.**

क्रमांक नपसा-मु.अ.-१९१०-२०२१.—

शासनाचे नगर विकास विभागाची अधिसूचना क्र. एमयुएन-२०१४-प्र.क्र.९९-नवि १८, दिनांक १४-७-२०१६ अन्वये नगर परिषद साकोली नव्याने अस्तित्वात आलेली आहे. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २१(२) अन्वये नगर परिषद क्षेत्राचा नियोजनबद्ध विकास होण्यासाठी विकास योजना तयार करणे आवश्यक आहे.

सबब, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम२१(२) अनुषंगाने कलम २३(१) अन्वये नगर परिषद साकोली क्षेत्रासाठी विकास योजना तयार करण्याचा इरादा जाहिर करण्यासाठी सर्वसाधारण सभेचा ठराव क्र. ३, दिनांक ३०-३-२०२१ अन्वये मान्यता दिली आहे. त्यानुसार सदरची सूचना प्रसिद्ध करण्यात येत आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २३(२) नुसार साकोली नगर परिषद विकास योजनेमध्ये समाविष्ट असलेल्या क्षेत्राचा हद्द दर्शविणारा व मुख्याधिकारी यांनी स्वाक्षांकित केलेला नकाशा, नगर परिषदेच्या कार्यालयात, कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी, कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनासाठी ठेवण्यात आलेला आहे.

ज्या नागरिकांच्या याबाबत काही सूचना/हरकती असतील त्यांनी ही सूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिद्ध होईल त्या तारखेपासून साठ(६०) दिवसांच्या आत मुख्याधिकारी, साकोली नगर परिषद यांचेकडे लेखी स्वरूपात द्याव्यात विकास योजना तयार करताना त्या सूचना हरकतींचा योग्य तो विचार करण्यात येईल.

**धनवंता ईश्वरदत्त राऊत,**
अध्यक्ष,
नगर परिषद, साकोली.

साकोली :
दिनांक १४ जून २०२१.

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १०६.

BY PRESIDENT, MUNICIPAL COUNCIL

**Declaration of Intention to prepare Development Plan of Sakoli Municipal Council as per Section 23(*1*) read with Section 21(*2*) of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966**

No. NPS-CO-1910-2021.—

Government of Maharashtra, Urban Development Department, *vide* it's Notification No. MUN-2014-C.R.-99-UD-18, dated 14-6-2016 constituted Sakoli Municipal Council. It is necessary to prepare the Development Plan for the area of Municipal Council as per Section 21(*2*) of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 for planned development of the said area.

Hence, the Sakoli Municipal Council by its Resolution No. 3, dated 30-3-2021 has given consent to declare intention to prepare Development Plan as per provision of Section 23(*1*) read with Section 21(*2*) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966. Accordingly, this notice is being published.

The plan showing boundary of the area included in Development Plan of the Sakoli Municipal Council is kept open for inspection by the public on office working days, during office hours at the office of the Municipal Council, as required under Section 23(*2*) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.

Any suggestion/objection of the public in this regard, may be forwarded in writing to the Chief Officer, Sakoli Municipal Council within a period of 60(Sixty) days from the date of publication of this notice in Maharashtra Government Gazette. The suggestions/objections shall be duly considered while preparing the Development Plan.

DHANWANTA ISHWARDATTA RAUT,
President,
Municipal Council, Sakoli.

Sakoli :
Dated the 14th June 2021.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.